सांकेतिक कब्जा सूचना

ICICI Bank

शाखा कार्यालय : आयसीआयसीआय बँक लि., कार्यालय क्रमांक २०१-बी, २रा मजला, रोड क्र. १, प्लॉट क्र - बी३, वायफाय आयटी पार्क, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४००६०४.

निम्नस्वाक्षरीकार यांनी आयसीआयसीआय बँकचे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून मागणी सूचना जारी करून खालील नमूद कर्जदारांस सूचनेतील नमूद रकमेची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या ६० दिवसांत करण्यास सांगितले होते.

रकमेची परतफेड करण्यास कर्जदार असमर्थ ठरल्याने, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीचा सांकेतिक कब्जा त्याला/तिला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सदर अॅक्टच्या कलम १३(४) अंतर्गत सहवाचता सदर रुल्सच्या नियम ८ अन्वये खालील नमूद तारखेस घेतला आहे. विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा आयसीआयसीआय बँक लिमिटेडच्या भाराअधीन राहील.

अ. क्र.	कर्जदाराचे नाव/ कर्ज खाते क्रमांक	मिळकतीचे वर्णन/ सांकेतिक कब्जाची तारीख	मागणी सूचनेची तारीख/ मागणी सूचनेतील रक्कम (रू.)	शाखेचे नाव
१.	रणजीत सिंग व सुखजीत कौर- एलबीबीआरडी०००००५४५८२९८	फ्लॅट क्र. सी-८०१, ८वा मजला, टॉवर-सी, इस्कॉन हबीबट, सरदार पटेल मार्ग, आर.एस. क्र.१६४, १६५, १६८, १७०, १७१ व १७२, सी.टी.एस. क्र. २५३७, २५३६, २५४३, २५३३, २५३५ व २५३४, सेवासी, गोत्री, वडोदरा-३८०००२१ / ऑगस्ट ०८, २०२४	एप्रिल ०६,२०२४ रु. २,६३,०१९८/-	वडोदरा

वरील नमूद कर्जदार/हमीदारांस याद्वारे ३० दिवसांत रकमेचा भरणा करण्यास सूचना देण्यात येत आहे, अन्यथा गहाण मिळकती सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ आणि ९ च्या तरतुदीं अंतर्गत सदर सूचना प्रकाशनाच्या ३० दिवसांच्या समाप्तीनंतर विकण्यात येतील.

दिनांक : ऑगस्ट १४, २०२४
स्थळ : नवी मुंबई

प्रामाणिकपणे अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयसीआयसीआय बँक लिमिटेड करीता

असोसिएटेड फिल्म इंडस्ट्रिज प्रा. लि.

नोंदणीकृत कार्यालय: फिल्मसेंटर बिल्डिंग, पहिला माळा, ६८ ताडदेव रोड, मुंबई-४०० ०३४
दूरध्वनी: २३५१२८२१-२२-२३-२४;
फॅक्स: २३५१२८२५;
ईमेल: filmcenter68@gmail.com
सीआयएन: U92110MH1954PTC009229

सुचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी अधिनियम, २०१३ चे कलम ९१ च्या तरतुदीच्या अनुषंगाने कंपनीच्या सभासदांची नोंदवही आणि शेअर हस्तांतर पुस्तिका शुक्रवार दिनांक २३ ऑगस्ट, २०२४ पासून शुक्रवार दिनांक ३० ऑगस्ट, २०२४ (दोन्ही दिवसांच्या समावेशासह) पर्यंत बंद ठेवण्यात येतील.

संचालक मंडळाच्या आदेशान्वये
असोसिएटेड फिल्म इंडस्ट्रिज प्रा. लि.
सही/-
रूबायत ए. पटेल
स्थळ : मुंबई — संचालक
दिनांक : १४.०८.२०२४ डी.आय.एन.: ०००२९२०६

PUBLIC NOTICE

TO WHOMSOEVER IT MAY CONCERN

This is to inform the General Public that following share certificate of **LUPIN LIMITED**, having registered office at **3rd Floor, Kalpataru Inspire, Off. Western Expressway Highway, Santacruz (East), Mumbai 400055.** registered in the name of the following Shareholder have been lost/misplaced and the holder[s] of the said securities / applicant[s] has/have applied to the Company to issue duplicate certificate[s].

Name of the holder	Folio No	Security Certificate No.	Distinctive Nos.		Securities held
			From	To	
HIMANSHU C ASHAR	39167	10724	2377301	2378500	1200

The Public are hereby cautioned against purchasing or dealing in any way with the above referred share certificate[s].
Any person who has any claim in respect of the said share certificate[s] should lodge such claim with the Company or its Registrar and Transfer Agents **Link Intime India Pvt Ltd., 247 Park, C-101, 1st Floor, L. B. S. Marg, Vikhroli (W) Mumbai - 400083. TEL: 8108116767.** Within 15 days of publication of this notice after which no claim will be entertained and the Company shall proceed to issue with the Duplicate Share Certificate[s].
Place: **MUMBAI**
Name[s] of the holder[s] / Legal Claimant: **HIMANSHU C ASHAR**
PAN Number AABPA4947R
Date: 14th August, 2024

जाहीर नोटीस

भारत सरकार
पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय
(I. A.III. विभाग)
इंदिरा पर्यावरणभवन जोर बाग रोड नवी दिल्ली.३
यांच्या कडून क्रमांक
EC24C3801MH5266415N File No.
21-115/2024-IA.III अन्वये दिनांक १ ऑगस्ट २०२४ न.भू.मा.क्रं.३३अ, ६२आणि ७६ मौजे मजास, जोगेश्वरी, मुंबई, या भूखंड येथे मे. अलडर रेसिडेन्सी प्रा. लि. यांचे वर प्रस्तावित रहवाशी ww ww पुनर्विकासाच्या प्रकल्पाला पर्यावरण विषयक परवानगी देण्यात आलेली आहे. सदर परवानगी पत्राच्या प्रती, भारत सरकारच्या परिवेष http://parivesh.nic.in या वेबसाइटवर देखील पाहता येतील .

संचालक
मे. अलडर रेसिडेन्सी प्रा. लि.
१०१, कल्पतरू सिर्नजी, ग्रैंड हयात समोर, वाकोला, सांताक्रुझ (पू), मुंबई ४०००५५

शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लि.

नोंदणीकृत कार्यालय: 501, सालकॉन ऑरम, जसोला डिस्ट्रिक्ट सेंटर, नवी दिल्ली - 110025
सीआयएन: U65900DL2020PLC366027

लिलाव सूचना

शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लि. च्या खालील कर्जदारांना याद्वारे कळविण्यात येते की बँकेकडून त्यांनी सोने कर्ज घेतले आणि बँकेद्वारे जारी केलेल्या वैयक्तीक सूचनांसह विविध मागण्या आणि सूचना पाठवूनही त्यांनी समायोजित केलेले नाही. सर्व कर्जदारांना याद्वारे कळविण्यांत येते की बँकेकडे तारण म्हणून सोने दागिण्यांचा लिलाव करण्याचे ठरवले आहे आणि त्यानुसार **28.08.2024** रोजी **दु. 03.00 वा.** हि तारीख जेथून कर्ज घेतले होते त्या शाखा परिसरात लिलावाची तारीख म्हणून निश्चित करण्यांत आली आहे. कर्जदार, खाते धारक आणि तमाम जनतेसह सर्व लिलावाच्या अटी आणि शर्तीनुसार सदर लिलावात सहभागी होऊ शकतात.

शाखा	खाते क्र.	खाते धारकाचे नाव	वडील/पती/ पत्नीचे नाव	पत्ता	खाते उघडण्याची तारीख	देणे
माजीवाडा ठाणे	103042512752	राहुल एस यादव	सुभाष यादवयांचा मुलगा	श्री हनुमान कृपा चाळ, रुम क्र ६९९६ रोड क्र ३४ वागळे इस्टेट, ठाणे महाराष्ट्र ४००६०४	29/06/2023	79503.17
माजीवाडा ठाणे	103042513224	जयराम के पारसराम	काशिराम यांचा मुलगा	अहमद चाळ, राजेंद्र नगर, दत्तापाडा रोड, हनुमान मंदिर जवळ, मुंबई, महाराष्ट्र ४०००६६	23/08/2023	85858.41
माजीवाडा ठाणे	103042514418	मोहम्मद एफ आलम	मोहम्मद मोतीउर रहमान यांचा मुलगा	डी-३, बॅग हाऊस सॅमसन, सदन मोहिली गाव राधे श्याम हॉटेल साकी नाका मुंबई महाराष्ट्र ४०००७२	07/12/2023	42826.07
माजीवाडा ठाणे	103042513780	अरविंद एन पाल	निखिद्दी पाल यांचा मुलगा	बी-१०७, श्री साई गणेश साई बाबा नगर, नवघर रोड होलीक्रॉस स्कुल जवळ भाईंदर पूर्व साई बाबा नगर ठाणे महाराष्ट्र ४०११०५	18/10/2023	216875.11
माजीवाडा ठाणे	103042514360	केतन अढिया	महेंद्र अढिया यांचा मुलगा	ए २०१ वुडलॅन्ड यमुना नगर न्यू लिंक रोड कॅफे कॉफी डेसमोर अंधेरी पश्चिम मुंबई महाराष्ट्र ४०००५३	01/12/2023	176792.40
माजीवाडा ठाणे	103042514350	केतन अढिया	महेंद्र अढिया यांचा मुलगा	ए २०१ वुडलॅन्ड यमुना नगर न्यू लिंक रोड कॅफे कॉफी डेसमोर अंधेरी पश्चिम मुंबई महाराष्ट्र ४०००५३	01/12/2023	198256.94
माजीवाडा ठाण	103742510051	केतन अढिया	महेंद्र अढिया यांचा मुलगा	ए २०१ वुडलॅन्ड यमुना नगर न्यू लिंक रोड कॅफे कॉफी डेसमोर अंधेरी पश्चिम मुंबई महाराष्ट्र ४०००५३	29/12/2023	306062.17
माजीवाडा ठाणे	103742510064	केतन अढिया	महेंद्र अढिया यांचा मुलगा	ए २०१ वुडलॅन्ड यमुना नगर न्यू लिंक रोड कॅफे कॉफी डेसमोर अंधेरी पश्चिम मुंबई महाराष्ट्र ४०००५३	30/12/2023	600119.88
पुणे टिळक रोड	103042512841	निलमकुमार पी भंडारी	सी/ओ पोपटलाल	ए १ विष्णू विहार पाचवा मजला फ्लॅट क्र १४ बिबवेवाडी कोंडवा रोड हनुमान सुपर मार्केट सीटीच्यावर, महाराष्ट्र ४११०३७	07/07/2023	814211.49
पुणे टिळक रोड	104242510189	निलमकुमार पी भंडारी	सी/ओ पोपटलाल	ए १ विष्णू विहार पाचवा मजला फ्लॅट क्र १४ बिबवेवाडी कोंडवा रोड हनुमान सुपर मार्केट सीटीच्यावर, महाराष्ट्र ४११०३७	01/02/2024	1336575.43
पुणे टिळक रोड	103042513184	अनित के झा	सी/ओ निकी कुमारी	एस एन २२ १ए बी ७०३ साई श्री पिंपळे सौदागर पुणे शहर पुणे महाराष्ट्र ४११०२७	18/08/2023	23889.68
पुणे टिळक रोड	103042513735	अनित के झा	सी/ओ निकी कुमारी	एस एन २२ १ए बी ७०३ साई श्री पिंपळे सौदागर पुणे शहर पुणे महाराष्ट्र ४११०२७	14/10/2023	43439.64

लिलाव दिनांक २८.०८.२०२४ रोजीस दु. ३.०० वा.

बँकेने कोणत्याही पूर्वसूचना न देता लिलावातून कोणतेही खाते रद्द करणे किंवा लिलाव रद्द करण्याचा हक्क राखून ठेवला.

प्राधिकृत अधिकारी, शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लि.

जाहीर नोटीस

भारत सरकार
पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय
(I. A.III. विभाग)
इंदिरा पर्यावरणभवन जोर बाग रोड नवी दिल्ली.३
यांच्या कडून क्रमांक
EC24C3801MH5917203N File No.
21-118/2024-IA.III. अन्वये दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी मे. कल्पतरू प्रॉपटिज प्रा. लि. यांच्या न.भू.मा.क्रं. ६२९ (भाग), ww मौजे वादें, वादें, पुर्व, मुंबई, स्थित (MIG-V) रहवाशी पुनर्विकासाच्या प्रकल्पाला पर्यावरण विषयक परवानगी देण्यात आलेली आहे. सदर परवानगी पत्राच्या प्रती, भारत सरकारच्या परिवेष http://parivesh.nic.in वेबसाइटवर पाहता येतील.

संचालक
मे. कल्पतरू प्रॉपटिज प्रा. लि. १०१,
कल्पतरू सिर्नजी, ग्रँड हयात समोर, वाकोला, सांताक्रुझ (पू), मुंबई ४०००५५

जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते कि, आम्ही दिनांक १० सप्टेंबर, १९८६ रोजीचा नोंदणी क्र बीओएम/डब्ल्युआर/एचएसजी/टीसी/२२६२/८६-८७ धारक महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी ऍक्ट, १९६० च्या तरतुदींतर्गत नोंदणीकृत सोसायटी कृष्णा नगर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड आणि दिनांक २२ जानेवारी,१९८७ रोजीच्या नोंदणी क्र. बीओएम/डब्ल्युआर/एचएसजी/टीसी/२४१९ धारक महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी ऍक्ट, १९६० च्या तरतुदींतर्गत नोंदणीकृत सोसायटी कृष्णा नगर बिल्डिंग क्र. १ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड आणि ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय येथे प्लॉट क्र. ६०, चंदावरकर रोड, बोरिवली-पश्चिम, मुंबई - ४०००९२ (यानंतर सोसायटी असे उल्लेखित) यांच्या येथे खालील लिखित परिशिष्टात अधिक अधिक तपशीलवारपणे वर्णिलेली अविभाजित जमीन त्यासह त्यावरील उभारीत इमारती (यानंतर मिळकत असे उल्लेखित) आणि सदर मिळकतीच्या संदर्भात पॅन एएएक्सएफव्ही२७९जी असलेल्या लिमिटेड लाएबिलिटी ऍक्ट, २००८ च्या तरतुदींतर्गत विधिसंपादित एक लिमिटेड लाएबिलिटी फर्म वीणा स्कायलाईन एलएलपी (यानंतर विकासक असे उल्लेखित) द्वारे प्राप्त/संपादित विकासाधिकारांच्या संदर्भातील नामाधिकारांची तपासणी करत आहोत.

सर्व व्यक्तींना सदर मिळकत किंवा त्यावरील कोणत्याही कोणत्याही भागाच्या संदर्भात विक्री, विकासाधिकार, कुळमुखत्यारपत्र, टीडीआर हक्क, एफएसआय हक्क, अदलाबदल, गहाण, भेट, वाटपपत्रे, धारणाधिकार, विश्वस्त, भाडेपट्टा, ताबा, वारसा, सुविधाधिकार, प्रभार, निर्वाह, परवाना, शेअर, अभिहस्तांकन, कोणत्याही प्रकारच्या भाराच्या मार्गे कोणताही ,हक्क, नामाधिकार, मागणी किंवा मालमत्ता हितसंबंध असल्याचा दावा असल्यास याद्वारे तसे लिखित स्वरूपात पुरक दस्तावेजी पुराव्यांसह निम्नस्वाक्षरीकारांना त्यांचे कार्यालय येथे १६१७, सी विंग, वन बीकेसी, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०००५१ येथे सदर सूचनेच्या प्रकाशनापासून ७ (सात) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे. अन्यथा तसे जर काही असल्यास ते त्यागित समजले जातील.

वरील उल्लेखित परिशिष्ट:

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दींमधील आणि नोंदणीकृत जिल्हा मुंबई उपनगरांमधील चंदावरकर रोड, बोरिवली-पश्चिम, मुंबई - ४०००९२ येथे स्थित टीपीएस-१ (जुना सीटीएस क्र. ५३७, ५३७/१ ते ९) चा अंतिम प्लॉट क्र. ६०, मोजमापित अंदाजे ७५९२ (सात हजार पाचशे ब्याऐंशी मात्र) चौरस मीटर्स, गाव बोरिवली, तालुका बोरिवलीचे ते सर्व भाग आणि विभाग एकत्रित सह त्यावर उभारीत (१) दोन विंग्स म्हणजेच ५७ निवासी फ्लॅट्स आणि ३ कमर्शियल शॉप्सच्या समाविष्टीत ए आणि ४१ निवासी फ्लॅट्स आणि १० कमर्शियल शॉप्स, एकूण ९८ निवासी फ्लॅट्स आणि १३ कमर्शियल शॉप्सच्या समाविष्टीत कृष्णा नगर बिल्डिंग क्र. १ सीएचएसएल; आणि (२) दोन विंग्स म्हणजेच ४४ निवासी फ्लॅट्सच्या समाविष्टीत बी विंग आणि ५५ निवासी फ्लॅट्सच्या समाविष्टीत सी विंग, एकूण ९९ निवासी फ्लॅट्सच्या समाविष्टीत कृष्णा नगर सीएचएसएल आणि खालीलप्रमाणे सीमाबद्धता:

उत्तरेला किंवा त्यादिशेने: ३० फू. रस्ता
दक्षिणेला किंवा त्यादिशेने: चंदावरकर रोड
पूर्वेला किंवा त्यादिशेने: ३० फू. रस्ता
पश्चिमेला किंवा त्यादिशेने: पराग सीएचएसएल

श्री. देवांग मेहता,
भागिदार
मे. एसएल पार्टनर्स
सदर दिनांक १४ ऑगस्ट, २०२४. **वकील आणि सॉलिसिटर्स**

केनरा बँक Canara Bank

Syndicate

नाशिक शहर शाखा
जाधव संकुल, जुना आग्रा रोड, पी.बी. क्र. ४१४, नाशिक-४२२००२.
मेल: cb0240@canarabank.com

संदर्भ: सीबी/१३(२)/सरफैसी/नितिनकुमारभिकाजीशिंदे/२०२४

दिनांक: १९.०७.२०२४

प्रति,
१. कर्जदार: नितिनकुमार भिकाजी शिंदे
पत्ता : ५८९, जय शास्त्री नगर,
जीजीएस रोड, मुलुंड पश्चिम, मुंबई-४०००८२.
२. हमीदार: ज्ञाती मोहिनीराज पवार
पत्ता : फ्लॅट क्र. ३, सी६/बी,
इंदिरा नगर, नाशिक, नाशिक- ४२२००५.

महोदय,

विषय : सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत जारी सूचना

निम्नस्वाक्षरीकार सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (यानंतर ''ॲक्ट'' असा उल्लेख) अन्वये नियुक्त कॅनरा बँकेचे, प्राधिकृत अधिकारी म्हणुन याद्वारे तुम्हाला खालीलप्रमाणे सूचना जारी करत आहेत.

की, **श्री. नितिनकुमार भिकाजी शिंदे** (यानंतर ''कर्जदार'' असा उल्लेख) यांनी येथे खालील **परिशिष्ट ए** मध्ये नमुद पत सुविधा/सुविधा घेतल्या आणि तारण धनकोंच्या नावे तारण करार केला. सदर वित्तीय सहाय्य घेतेवेळी तुम्ही वरील नमुद कराराच्या अटी आणि शर्तींनुसार कर्ज रकमेचा परतावा करण्याची हमी दिली आहे.

की, **ज्ञाती मोहिनीराज पवार** (यानंतर ''हमीदार'' असा उल्लेख) यांनी त्यावरील व्याजासह **रु. ९,८०,०००.०० (रु. नऊ लाख ऐंशी हजार मात्र)** च्या मर्यादेपर्यंत पत सुविधेकरिता कर्जदारांद्वारे तारण धनकोंसाठी उपार्जित किंवा देणे सर्व दायित्त्व निभावणे आणि सर्व पैशांची मागणी केल्यावर प्रदान करण्याची हमी दिली आहे.

तुम्ही (**परिशिष्ट बी** मध्ये नमुद व्यक्ती) नी तारण मत्तांच्या सापेक्ष करार सुध्दा केला आहे, ज्याचा तपशिल येथील खालील **परिशिष्ट बी** मध्ये दिलेला आहे.

तथापि, **मे, २०२४** पासून सदर वित्त सहाय्य/पत सुविधांचे प्रचालन आणि चलनवलन अनियमित बनले आहे. तारण मत्तांद्वारे ठेवण्यात येणारी हिशेब पुस्तके दर्शवतात की, **रु. ६,६५,५८४.०८ (रुपये सहा लाख पासष्ट हजार पाचशे चौऱ्याऐंशी आणि पैसे आठ मात्र)+ त्यावरील व्याज आणि खर्चाच्या** रक्कमेचे १९/०७/२०२४ रोजीस तारण धनकोंच्या प्रती कर्जदारांचे दायित्त्व आहे, ज्यांचे तपशील येथील खालील **परिशिष्ट सी** मध्ये दिले आहेत. पुढे नमुद करण्यात येते की, कर्जदार/हमीदार यांनी दिलेल्या मुदतीत तारण धनकोंची थकबाकी भागवण्यासंबंधी वरील सदर करारांच्या अटी पाळण्यात तुम्ही कसूर केली आणि थकबाकी चुकती करण्यात टाळाटाळ केलीत. वरील सदर वित्त सहाय्य/पत सुविधांचे प्रचालन आणि चलनवलन ठप्प झाल्याने आणि मुद्दल कर्ज, हप्ते आणि त्यावरील व्याज यांची परतफेड करण्यात तुम्ही केलेल्या कसुरीच्या परिणामी तारण धनकोंना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने जारी केलेल्या मालमत्ता वर्गीकरणाशी संबंधित मार्गदर्शक तत्त्वे/निर्देशांनुसार **०१/०७/२०२४** रोजी तुमच्या कर्जाचे वर्गीकरण नॉन परफॉर्मिंग ॲसेट **(एनपीए)** असे करणे भाग पडले.

सदर सूचनेद्वारे तारण धनको तुमच्या निदर्शनास आणून देतात की, तुम्ही सदर देणे/थकबाकी दायित्वे यांची परतफेड करण्यात कसूर केली आणि टाळाटाळ केली आणि म्हणून याद्वारे तुम्हाला **सदर सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांत** तारण धनकोंना येथे खालील **परिशिष्ट सी** मध्ये वर्णन केलेले कर्जदारांचे संपूर्ण दायित्व चुकते करण्याकरिता ॲक्टच्या कलम १३(२) अन्वये ही सूचना जारी करून सांगत आहे. तुम्ही ९.२०% दराने भविष्यातील व्याज + २.३६% दंड व्याजासह, तिची थकबाकी वसूल करण्याकरिता तारण धनकोंनी सुरू केलेल्या कार्यवाही संबंधात आलेल्या सर्व खर्च आकार, परिव्यय आणि अनुषंगिक परिव्यय ह्यासह एकत्रितपणे रकमेचे प्रदान करण्यासही बांधिल आहात.

कृपया ही सत्य परिस्थिती ध्यानांत घ्यावी की, ॲक्टच्या कलम १३(२) अंतर्गत सदर सूचनेच्या बाबतीत वरीलप्रमाणे पुढील व्याज आणि अनुषंगिक परिव्यय आणि खर्च सह एकत्रित **रु. ६,६५,५८४.०८ (रुपये सहा लाख पासष्ट हजार पाचशे चौऱ्याऐंशी आणि पैसे आठ मात्र)** च्या वरील सदर रकमेची तारण धनकोंना परतफेड करण्यात तुम्ही कसूर केल्यास, तारण धनको कलम १३च्या पोट-कलम (४) (ए) व (बी) अंतर्गत तपशिलातील तिचे कोणतेही किंवा सर्व अधिकार वापरेल, ज्यांचा सारांश तुम्हाला प्रकरणाचे गांभिर्य समजावे म्हणून येथे खाली नमूद करण्यात येत आहे.

''१३(४)-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत संपूर्ण थकबाकी दायित्व चुकते करण्यात कर्जदारांनी कसूर केली तर, तारण धनको त्यांचे कर्ज वसूल करण्याकरिता खालीलपैकी एका किंवा जास्त उपाययोजनांची मदत घेऊ शकतात, म्हणजेच'',

ए) तारण मत्तेची रोकड करण्याकरिता भाडेपट्टा, अभिहस्तांकन किंवा विक्री द्वारे हस्तांतरण करण्याच्या अधिकारास कर्जदारांच्या तारण मत्तांचा कब्जा घेणे,

(बी) तारण मत्तेची रोकड करण्याकरिता भाडेपट्टा, अभिहस्तांकन किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याच्या अधिकारासह कर्जदारांच्या व्यवसायाचे व्यवस्थापन हाती घेणे.

तथापि, भाडेपट्टा, अभिहस्तांतरण किंवा विक्रीच्या माध्यमातून हस्तांतरण करण्याचा अधिकार तेव्हाच वापरावा जेव्हा कर्जदारांच्या व्यवसायाचा बराचसा हिस्सा कर्जासाठी तारण म्हणून धारण केलेला असेल.

पुढे असे की, जेथे संपूर्ण व्यवसायाचे किंवा व्यवसायाच्या हिश्श्याचे व्यवस्थापन वेगवेगळे होऊ शकते तेव्हा तारण धनकोंनी कर्जासाठी तारणाशी संबंधित असलेल्या कर्जदारांच्या अशा व्यवसायाचे व्यवस्थापन हाती घ्यावे जे सदर ॲक्टच्या अन्य प्रयोज्य तरतुदी आणि कर्जाच्या तारणांशी संबंधित आहेत.

तुमचे लक्ष तारण मत्ता विमोचनासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कलम १३ च्या पोट कलम (८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

तुम्हाला ही सूचना देखील देण्यात येते की, कलम १३(१३) च्या बाबतीत, तुम्ही बँकेची लेखी संमती घेतल्याशिवाय येथे खालील परिशिष्ट बी मध्ये तपशील दिलेल्या सदर तारण मत्तांचे विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत. पुढे तुमच्या निदर्शनास हे आणण्यात येते की, सदर ॲक्ट अंतर्गतच्या तरतुदीप्रमाणे ह्या वैधानिक निषेधाज्ञा/मनाई चे कोणतेही उल्लंघन केल्यास तो गुन्हा ठरेल आणि जर कोणत्याही कारणाने नियमित कामकाजाच्या ओघात तारण मत्ता विकल्या किंवा भाडेपट्ट्याने दिल्या तर विक्री रक्कम किंवा रोकड उत्पन्न तारण धनकोंकडे जमा करावे लागेल, या संदर्भात अशा रोकड/उत्पन्नाचा योग्य हिशेब तुम्हाला सादर करावा लागेल.

ही मागणी सूचना, तुमच्याकडून देय आणि थकीत असल्याचे आढळून येणाऱ्या रकमांसाठी पुढील मागण्यांसह तारण धनकोंना असलेल्या अन्य कोणत्याही अधिकार किंवा उपाययोजनांना बाधा न आणता दिली आहे.

ॲक्ट अंतर्गत आणि/किंवा सध्या प्रचलित असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये आम्हाला उपलब्ध असलेल्या अन्य कोणत्याही अधिकारांना बाधा येऊ न देता ही सूचना दिली आहे.

कृपया ह्या सूचने अंतर्गत केलेल्या मागणीचे पालन करा आणि सर्व अप्रीय गोष्टी टाळा. अनुपालन न केल्यास, सर्व खर्च आणि परिणामांसाठी तुम्हाला जबाबदार धरून, आवश्यक ती पुढील कारवाई केली जाईल.

कॅनरा बँक करिता
सही/-
संतोष मिंदे
प्राधिकृत अधिकारी

ताबा सूचना

(स्थावर मालमत्तेसाठी)

ज्या अर्थी,

निम्नस्वाक्षरीकार **सम्मान कॅपिटल लिमिटेड (CIN:L65922DL2005PLC136029) (यापूर्वी इंडियाबुल्स हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जात होते)** सिक्योरिटाइजेशन अॅण्ड रिकन्सट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्योरीटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अन्वये प्राधिकृत अधिकारी आणि सदर सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून स्पष्ट 60 दिवसांच्या आत **15.05.2024** रोजी सूचनेत नमूद केलेली आणि अधिक रक्कम **रू. 12,36,553.99 (रूपये बारा लाख छत्तीस हजार पाचशे त्रेपन्न आणि नव्याण्णव पैसे फक्त)** साठी **कर्ज खाते क्र. HHLBAD00423286** या रकमेची परत फेड करण्याची दिनांक **15.05.2024** पासून ते प्रत्यक्ष भरणा करेपर्यंतची मागणी, सूचना कर्जदार **तुषार महाडिक उर्फ तुषार सुरेश महाडिक आणि सीमा सुरेश महाडिक** यांना कलम 13(12) सह सिक्योरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रूल्स, 2002 चा नियम 3 अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारात जारी केली.

सदर रकमेची परतफेड करण्यात कर्जदार अपयशी ठरल्यामुळे याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, सदर कायद्याचे कलम 13 ची उप कलम (4) सह सिक्योरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रूल्स, **2002** चा नियम **8** अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारात खाली वर्णन केलेल्या मालमतेचा निम्न स्वाक्षरीकाराने **प्रतिकात्मक ताबा 09.08.2024.** रोजी घेतलेला आहे.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे खबरदार करण्यात येते की, या मालमत्तेचे व्यवहार करू नयेत आणि कोणत्याही व्यवहारावर **सम्मान कॅपिटल लिमिटेड (यापूर्वी इंडियाबुल्स हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जात होते)** ची कर्ज आकारणी **रू. 12,36,553.99 (रूपये बारा लाख छत्तीस हजार पाचशे त्रेपन्न आणि नव्याण्णव पैसे फक्त)** पुढील व्याज **15.05.2024** पासून प्रत्यक्ष भरणा करेपर्यंत लागेल.

कर्जदारांचे लक्ष्य कलम 13 चे उप-कलम (8) च्या मालमत्ता / मालमत्तेला मुक्त करण्यासाठी उपलब्ध वेळेकडे आकर्षित केले जात आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

दुसऱ्या मजल्यावर, फ्लॅट क्र. 203 ज्याचे चटई क्षेत्र 27.75 स्क्वे. मीटर्स, विंग-बी, प्राइम बालाजी हाइट्स म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रकल्पात, सर्वेक्षण क्र. 139, हिसा क्र. 2, बदलापूर गावात वसलेले, मंजिरी हाईट्स जवळ, बदलापूर (पश्चिम), तालुका अंबरनाथ, ठाणे-421503, महाराष्ट्र.

सही/-
अधिकृत अधिकारी
तारीख :09.08.2024 **सम्मान कॅपिटल लिमिटेड**
स्थळ : ठाणे **(यापूर्वी इंडियाबुल्स हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जात होते)**

दी नॅशनल को- ऑपरेटिव्ह बँक लि.

National Bank

नोंद. कार्यालय : २१४, रहेजा सेंटर, फ्रि प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई-४०००२१.
वसुली विभाग : प्लॉट क्र. ८सी, १ला मजला, सेक्टर-१३, खांदा कॉलनी, नविन पनवेल, रायगड-४१०२०६, **ईमेल पत्ता :** recovery@ncbmumbai.com
दू. क्र. ०२२-२७४५८६२८

लिलाव विक्रीची सूचना

खालील जमीन ही ०१.०८.२०२४ पासून संपूर्ण कर्ज थकबाकीच्या वसुली पर्यंत पुढील व्याज आणि खर्च, आकार व परिव्यय यासह एकत्रित रित्या ३१.०७.२०२४ रोजीसच्या रु. ६,७९,६७,००३/- (रुपये सहा करोड एकोणऐंशी लाख सदुसष्ट हजार तीन मात्र) च्या वसुलीसाठी मे. शेखावती इंटरिअर्स मार्फत मालक श्री. मोहनलाल प्रल्हादका यांना मंजूर केलेल्या अग्रिमांसाठी एक तारण म्हणून दी नॅशनल को- ऑप. बँक लि. च्या नावात मे. शेखावती इंटरिअर्स मार्फत मालक श्री. मोहनलाल प्रल्हादका यांनी गहाण ठेवली. सदर जमीन एमसीएस ॲक्ट, १९६० च्या कलम १०१ अंतर्गत संबंधित प्राधिकरणाकडुन प्राप्त वसुली प्रमाणपत्रानुसार दी नॅशनल को- ऑप. बँक लि. ला देय थकबाकीच्या वसुलीसाठी तिच्या समोर नमुद केलेल्या तारखेस जाहीर लिलावाने विकण्यात येणार आहे आणि ती बँकेने रितसर जप्त केली आहे आणि सध्या बँकेच्या कब्जात आहे.

मिळकतीचे वर्णन	राखीव किंमत (रु.लाखांत)	इसारा अनामत (रु. हजारात)	लिलावाचे आणि निरीक्षणाची तारीख आणि वेळ व ठिकाण
गट क्र. १६४/१, १६४/२ व ४७२ गाव वाकी, तालुका डहाणू, जि.पालघर मोज. ८८६.५१ गुंठा	रु. ८,००,००,०००.००	रु. ८०,००,०००.००	निरीक्षण - दिनांक: ०९/०९/२०२४ स. ११.०० ते सायं. ५ आणि लिलाव दिनांक: १७/०९/२०२४ स. ११.३० दी नॅशनल को-ऑप बँक लि., दुकान क्र. १ आणि २, तळ मजला, र